**CNR. No. MHBU090010332022.**

निशाणी क्रमांक–४८.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल दिनांक | : | १२/०७/२०१९ | | |
| नोंदणी दिनांक | : | १२/०७/२०१९ | | |
| निकाल तारीख | : | २४/०३/२०२६ | | |
| कालावधी | : | वर्ष | महिना | दिवस |
| | | ०६ | ०८ | १२ |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, यांचे न्यायालय, जळगाव (जामोद).**

**(पिठासीन न्यायाधीश पि.डी. मेंढे)**

**न्यायनिर्णय**

**(दिनांक २४ मार्च, २०२६ रोजी पारीत)**

**नियमित फौजदारी मामला क्रमांक १३३/२०१९**

**अपराध क्रं. २०७/२०१९, पोलीस स्टेशन, जळगाव (जामोद).**

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पोलीस स्टेशन, जळगाव (जामोद),<br>ता. जळगाव (जामोद), जिल्हा बुलढाणा. |
| यांचे तर्फे | | सहा. सरकारी अभियोक्ता: श्री. ए.जे.इंगळे. |
| **आरोपी** | ०१ | **उमेश सुरेश निवणे**<br>वय–३१ वर्षे, व्यवसाय – शेती, |
| | ०२ | **सौ. मनिषा उमेश निवणे**<br>वय–३० वर्षे, व्यवसाय – शेती,<br>आरोपी रा. झाडेगाव, |

| | | |
|---|---|---|
| | | ता. जळगाव (जामोद), जि. बुलढाणा. |
| यांचे तर्फे | | विद्वान वकील श्री. एस. ए. गुप्ता |
| गुन्हा घडल्याचा दिनांक | | ०८/०४/२०१९ |
| प्रथम खबरचा दिनांक | | ०८/०४/२०१९ |
| दोषारोपपत्र दिनांक | | १२/०७/२०१९ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | | २६/०७/२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | | ०५/०४/२०२३ |
| न्यायनिर्णयसाठी राखीव दिनांक | | निरंक |
| न्यायनिर्णय घोषीत केल्याचा दिनांक | | २४/०३/२०२६ |
| शिक्षा झाल्याचा दिनांक | | निरंक. |

**<u>आरोपींची माहिती</u>**

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेचा दिनांक | आरोपीच्या जमानतचा दिनांक | कलम व कायदा | आरोपी दोषी किंवा निर्दोष | शिक्षा झाल्याचा दिनांक | कलम ४२८, फौ.प्र.सं. च्या उद्देशाने खटल्या दरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | उमेश सुरेश निवणे | २९/०५/१९ | २९/०५/१९ | भा.दं.वी. कलम | निर्दोष | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २९४, ३२३, ५०६ सहकलम ३४ अन्वये दंडनिय अपराध | | | |
| २. | सौ. मनिषा उमेश निवणे | २९/०५/१९ | २९/०५/१९ | भा.दं.वी. कलम २९४, ३२३, ५०६ सहकलम ३४ अन्वये दंडनिय अपराध | निर्दोष | निरंक | निरंक |

**<u>अभियोग पक्षाचे / बचावपक्षाचे/न्यायालयाचे साक्षीदारांची यादी</u>**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | वसंतराव झाबाराव चोपडे (नि.क्र.२३) | घटनास्थळ पंच |
| सा.क्र.२ | पद्माकर ओंकार तायडे (नि.क्र. २६) | फिर्यादी |

| | | |
|---|---|---|
| सा.क्र.३ | शेषराव मिराजी तायडे (नि.क्र. ३१) | साक्षीदार |
| सा.क्र.४ | रविंद्र दामोधर नेमाडे (नि.क्र. ४४) | साक्षीदार |

**१.** आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम २९४, ३२३, ५०६ सहकलम ३४ अंतर्गत खटला चालविण्यात आला.

**२.** अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत अशी की, दिनांक ०८/०४/२०१९ रोजी सकाळी अंदाजे ०९.०० वाजताच्या दरम्यान मौजा झाडेगाव, ता. जळगाव जामोद येथे फिर्यादी नामे पद्माकर ओंकार तायडे हे कुलरची फ्रेम वेल्डींग करण्याकरीता निलेश सुरेश निवणे यांच्या घरासमोर रस्त्यावर उभा असतांना आरोपी क्र. १ व २ ने फिर्यादीला "मादरचोदा तुझ्या मायचा भोसडा" अशी शिवीगाळ करून आरोपी क्र. १ ने फिर्यादीला चापटांनी मारहाण करून जिवाने खल्लास करून टाकण्याची धमकी दिली त्यामुळे फिर्यादीने पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली.

**३.** फिर्यादीने आरोपींविरुध्द दिलेल्या फिर्यादवरुन अपराध क्रमांक २०७/२०१९ भारतीय दंड विधानाचे कलम २९४, ३२३, ५०६ सहकलम ३४ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला. तपासाअंतर्गत संबंधीत तपासी अंमलदार यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला. त्याचप्रमाणे फिर्यादीचे व साक्षीदारांचे जबाब नोंदविले व तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोपत्र न्यायालयात सादर केले.

**४.** आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम २९४, ३२३, ५०६ सहकलम ३४ अंतर्गत दोषारोप (निशानी क्र.१६) निश्चीत करण्यात आला आणि आरोपीने सदर आरोपांचा त्यांना गुन्हा कबुल नसल्याचे आणि खटला चालविण्याची विनंती केली.

**५.** अभियोग पक्षाचा पुरावा व आरोपींचा बचाव लक्षात घेता खालील मुद्दे उपस्थीत होतात. मी त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, दिनांक ०८/०४/२०१९ रोजी ०९.०० वाजताच्या दरम्यान मौजा झाडेगाव, ता. जळगाव जामोद येथे आरोपींनी संगनमताने फिर्यादी यांना सार्वजनिक ठिकाणी "मादरचोदा तुझ्या मायचा भोसडा" अश्या अश्लील शब्दांत शिवीगाळ केली व त्याव्दारे आरोपींनी भां.दं.वि. चे कलम २९४ सहकलम ३४ नुसार गुन्हा केला ? | **नकारार्थी**. |
| २. | उपरोक्त वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादीला चापटांनी मारहाण करून इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली व त्याव्दारे आरोपींनी भा.दं.वि. चे कलम ३२३ सहकलम ३४ नुसार गुन्हा केला ? | **नकारार्थी**. |
| ३. | उपरोक्त वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादीला जिवाने मारण्याची धमकी दिली व त्याव्दारे आरोपींनी भा.दं.वि. चे कलम ५०६ सहकलम ३४ नुसार गुन्हा केला ? | **नकारार्थी**. |
| ४. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## का र ण मि मां सा

**६.** अभियोग पक्षाने आरोपींविरूद्ध दोषसिद्धी करण्यासाठी चार साक्षदारास तपासले. साक्षीदार क्र. १ वसंतराव झाबाराव चोपडे यांची साक्ष नि.क्र.२३ वर, फिर्यादी साक्षीदार क्र. २ पद्माकर ओंकार तायडे यांची साक्ष नि.क्र.२६ वर, साक्षीदार क्र. ३ शेषराव मिराजी तायडे यांची साक्ष नि.क्र.३१ वर, साक्षीदार क्र. ४ रविंद्र दामोधर नेमाडे यांची साक्ष नि.क्र.४४ वर, तोंडी रिपोर्ट नि.क्र. २७ वर व प्रथम छापील खबर अहवाल नि.क्र. २८ वर

तपासण्यात आले तसेच आरोपींचे फौ.प्र.सं. कलम ३१३ चे बयाण नोंदविण्यात आले.

**<u>मुद्दा क्र १ ते ३:-</u>**

७. मुद्दा क्र. १ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे ते एकत्र विचारात घेतले आहेत.

८. साक्षीदार क्र. १ वसंतराव झाबाराव चोपडे यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले की, पोलीसांनी त्यांना पंचनामा करण्याकरीता बोलाविले नव्हते. त्यांनी घटनास्थळ पंचनामा फक्त सहीपुरता कबुल केला. अभियोग पक्षाने सदर साक्षदारांना उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली परवानगी देण्यात आली. परंतू साक्षदारांनी उत्तर सूचक प्रश्नांची उत्तरे नकारात्मक स्वरुपात दिली. त्यामुळे त्यांचा पुरावा अभियोग पक्षाच्या उपयोगाचा ठरत नाही.

९. फिर्यादी साक्षीदार क्र. २ पद्माकर तायडे यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले की, ते आरोपींना ओळखतात. दोन्ही आरोपी त्यांच्या गावात राहतात. प्रस्तुत प्रकरणातील घटना दि. ०८/०४/२०१९ रोजी सकाळी घडली होती. आरोपी क्र. १ चा लहान भाऊ त्याच्या घरी वेल्डींगचे काम करत असल्यामुळे त्यांनी त्यांच्याकडे कुलरच्या फ्रेमचे काम करण्यासाठी टाकले होते, ते आणण्यासाठी ते त्यांच्याकडे गेले असता. आरोपी क्र.१ च्या घरासमोर त्याच्या बायकोने त्यांना ‘मादरचोद, भडव्या’ अशी अश्लील शिवीगाळ केली व आरोपी क्र. १ ने त्यांना 'तुला मारून टाकतो', अशी धमकी दिली होती. त्यानंतर त्यांनी पोलिस स्टेशनला आरोपींविरुद्ध तोंडी रिपोर्ट (नि.क्र. २७) व प्रथम खबरी अहवाल (नि.क्र. २८) दाखल नोंदविला. जेथे घटना घडली ती जागा त्यांनी पोलिसांना दाखविली.

१०. फिर्यादी यांनी आरोपीच्या वकिलांनी उलटतपासादरम्यान त्यांना प्रश्न विचारले असता त्यांनी आरोपीचे ट्रॅक्टर शेतीच्या उन्हाळी मशागतीसाठी भाड्याने घेतले

होते व त्यातील भाड्याचे पैसे त्यांच्याकडे बाकी होते तसेच ती रक्कम चार ते पाच महिने ते देवु शकले नाही, या बाबी त्यांनी मान्य केल्या. फिर्यादी यांनी जरी आरोपी क्र. १ ने त्यांना तुला मारून टाकतो, ट्रॅक्टरच्या खाली टाकतो, डायरेक्ट मारून टाकतो अशी धमकी दिल्याचे सांगितले परंतु सदर बाब त्यांच्या फिर्याद मध्ये नमुद नाही यावरून त्यांच्या कथनामध्ये लोपने असल्याचे दिसते. तसेच आरोपींनी सुध्दा त्यांच्याविरूध्द तक्रार दाखल केली त्यावरून त्यांच्यावर प्रकरण प्रलंबित असल्याचे त्यांनी कथन केले. यावरून सदर तक्रार पूर्ववैमनस्यातुन दिल्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे फिर्यादी यांच्या कथनाला इतर साक्षदारांचा दुजोरा मिळतो किंवा नाही हे पाहणे क्रमप्राप्त आहे.

**११.** साक्षीदार क्र. ३ शेषराव मिराजी तायडे यांनी त्यांच्या साक्षेत असे कथन केले की, ते फिर्यादी व आरोपींना ओळखत असुन ते त्यांच्या गावात राहतात. प्रस्तुत प्रकरणातील घटना अंदाजे दोन तीन वर्षापूर्वी घडली होती. आरोपी फिर्यादीसोबत भानगड करत होते. भांडण चालु होते, शिवीगाळ सुरू होती. आरोपी क्र. २ फिर्यादीला शिवीगाळ करत होती. परंतु काय शिवीगाळ करत होती हे त्यांना आठवत नाही. गावातील लोकांनी भांडण मिटविले होते. त्यांनी नाकारले की, त्यांच्यासमक्ष आरोपी क्र. २ मनिषा हिने फिर्यादीला 'मादरचोद, भोसडीच्या' अशी अश्लील शिवीगाळ केली हाती, आरोपी क्र. १ उमेशने फिर्यादीला चापटाबुक्यांनी मारहाण केली होती. पोलीसांनी त्यांचे बयान नोंदविले नव्हते. अभियोग पक्षाने साक्षदार क्र. ३ ला उत्तर सूचक प्रश्न विचारूनही त्यांनी उत्तर सूचक प्रश्नांची उत्तरे नकारात्मक स्वरुपात दिली. त्यामुळे त्यांचा पुरावा अभियोग पक्षाच्या उपयोगाचा ठरत नाही.

**१२.** साक्षीदार क्र. ४ रविंद्र दामोधर नेमाडे यांनी त्यांच्या साक्षेत असे कथन केले की, ते फिर्यादी व आरोपींना ओळखत असुन ते त्यांच्या शेजारी राहतात. घटनेबाबत त्यांना काहीही माहिती नाही. त्यांच्यासमक्ष कोणतीही घटना घडली नव्हती. सदर साक्षदाराने

अभियोग पक्षाला सहकार्य न केल्यामुळे त्यांचा पुरावा अभियोग पक्षाच्या उपयोगाचा ठरत नाही.

१३. सदर प्रकरणातील पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की,फिर्यादी यांनी जरी फिर्याद नि.क्र. २७ नोंदविली असली तरी त्यांच्या साक्षेमध्ये महत्वाची लोपने असुन आरोपी यांनीसुध्दा त्यांच्याविरूध्द तक्रार दिल्याचे त्यांच्या साक्षेवरून दिसुन येते. साक्षदार क्र. १, ३ व ४ यांनी फिर्यादीच्या कथनाला दुजोरा दिला नाही. सर्व साक्षदारांच्या साक्षेवरून घटनास्थळ हे सार्वजनिक ठिकाण होते याबाबत कोणताही उलगडा होत नाही. अभिलेखावरून उभय पक्षांनी एकमेकांविरूध्द फिर्याद दाखल केल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे सदर तक्रारीच्या सत्यतेबाबत संशय बळावतो. वरील सर्व बाबींचा विचार करता आरोपींनी संगनमताने फिर्यादीला आरोपी क्र. १ ने अश्लील शब्दांत शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली याबाबत कुठलाही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. तसेच इतर कोणत्याही स्वतंत्र साक्षदाराची साक्ष न तपासल्यामुळे तसेच साक्षदार क्र. १, ३ व ४ हे हितसबंधीत असल्यामुळे आरोपींनी कथीत गुन्हा केला, याबाबत काहीही अभिलेखावर आले नाही. अभियोग पक्षाने ज्या कलमाखाली सदरचे प्रकरण दाखल केले त्या कलमातील पूरक घटक अभियोग पक्ष निसंशयपणे सिद्ध करू शकले नाही. अभिलेखावर आलेला पुरावा आरोपींना शिक्षेपर्यंत नेण्याचा गुणवत्तेचा नाही. करीता मुद्दे क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देण्यात येते.

<u>मुद्दा क्र. ४:–</u>

१४. मुद्दा क्र. १ ते ३ च्या निष्कर्षावरून असे दिसून येते की, अभियोग पक्ष आरोपीं विरूद्ध गुन्हा सिद्ध करण्यास अयशस्वी ठरला. त्यामुळे आरोपीं निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. तसेच मुद्दा क्र. ४ च्या उत्तरार्थ खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**– आ दे श –**

१. आरोपी क्र. ०१ व ०२ ची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) प्रमाणे भारतीय दंड विधान कलम २९४, ३२३, ५०६ सहकलम ३४ मधून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींनी संपरिक्षेदरम्यान दाखल केलेली वैयक्तीक व जमानती बंधपत्रे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) नुसार ६ महिन्यापर्यंत कायम ठेवण्यात येतात. सदर कालावधीत या प्रकरणात आवाहन न झाल्यास बंधपत्रे रद्द होतील व जमानतदार बंधपत्रातून मुक्त होतील.

३. न्यायनिर्णय खूल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PRITI DNYANESHWAR MENDHE
Date: 2026.03.27 18:05:27 +0530

ठिकाण– जळगाव (जामोद).
दिनांक: २४/०३/२०२६.

(श्रीमती प्रिती ज्ञा. मेंढे)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
जळगाव (जामोद).

**प्र मा ण प त्र**

मी प्रमाणित करते की या पि.डी.एफ. आदेश फाईलमधील मजकुर हा मुळ आदेशातील मजकुराशी शब्दांशब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नावः– दिपक के. मतकर, लघुलेखक श्रेणी–३.

कोर्टाचे नावः– न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, जळगाव जामोद.

दिनांकः– २७/०३/२०२६.